- 6 NOV 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जनगणना माहिती कार्यकेंद्र दिशादर्शक

## डॉ. निरुपमा डांगे : शिवाजी विद्यापीठात जनगणना माहिती संशोधन कार्यकेंद्राचे उद्घाटन

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात स्थापन केलेल्या जनगणना माहिती कार्यकेंद्राद्वारे दर्जेदार संशोधनातून प्रशासनाला धोरण निश्चित करण्यासाठी दिशादर्शक ठरेल, असे प्रतिपादन जनगणना कार्य संचालनालयाच्या राज्य संचालक डॉ. निरुपमा डांगे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागात संचालनालयाच्या जनगणना माहिती संशोधन कार्यकेंद्राच्या उद्घाटन प्रसंगी त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. डांगे म्हणाल्या, जनगणनेद्वारे प्राप्त होणारी माहिती ही अत्यंत मूलभूत असते. शिवाजी विद्यापीठातील संशोधकांच्या या केंद्रामार्फत शास्त्रीय विश्लेषणद्वारे केंद्र सरकारला लोकहिताची धोरणे राबवणे अधिक सोयीचे होईल.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, राज्य शासनासमवेत शिवाजी विद्यापीठ अनेक संयुक्त सहकार्य प्रकल्पांवर काम करत आहे. त्यामध्ये काही जिल्ह्यांच्या योजना निर्धारणावरही [illegible] करण्यात येत आहे. जनगणना कार्य सचालनालयासमवेत झालेल्या सामंजस्य करारामुळे जनगणनेसारख्या अत्यंत मूलभूत माहितीच्या विश्लेषणावर संशोधकांना काम करणे शक्य होणार आहे.

वरीष्ठ अधिकारी ए. एन. राजीव यांनी विशेष सादरीकरण केले. सामंजस्य करारावर संचालनालयाच्यावतीने संचालक डॉ. डांगे यांनी तर विद्यापीठाच्यावतीने कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी स्वाक्षरी केल्या. डॉ. डांगे यांच्या हस्ते जनगणना माहिती संशोधन कार्यकेंद्राचे उद्घाटन केले.

अधिविभाग प्रमुख डॉ. शशीभूषण महाडिक यांनी स्वागत केले. डॉ. सोमनाथ पवार यांनी आभार मानले. यावेळी जनगणना कार्य संचालनालयाच्यावतीने व्ही. ए. अहिरे, वाय. एस. पाटील, किरण गुरव, प्रवीण भगत व अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. सरिता ठकार, प्रमुख डॉ. प्रकाश पवार, अभिजीत रेडेकर आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात जनगणना माहिती संशोधन कार्यकेंद्राच्या उद्घाटन प्रसंगी जनगणना कार्य संचालनालयाच्या संचालक डॉ. निरुपमा डांगे, सोबत कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, ए. एन. राजीव, डॉ. प्रकाश पवार, डॉ. शशीभूषण महाडिक आदी.**

### जनगणना माहिती संशोधन कार्यकेंद्राविषयी

देशातील विविध १८ विद्यापीठांमध्ये जनगणना माहिती संशोधन केंद्रांची स्थापना करण्याचे ठरवले. त्यानुसार शिवाजी विद्यापीठात १२ वे कार्यकेंद्र स्थापन केले आहे. या संशोधन केंद्रातील सुविधांचा लाभ विद्यापीठातील तसेच विद्यापीठाबाहेरील संशोधकांना घेता येणार आहे......

### जनगणना कार्य संचालनालयाविषयी

महारजिस्ट्रार कार्यालय हे केंद्रीय गृहमंत्रालयाचे संलग्न कार्यालय असून त्याची सध्या देशभरात ३५ कार्यालये आहेत. जनगणनेवेळी नागरिकाकडून सामाजिक, लोकसंख्याशास्त्रीय, आर्थिक, शैक्षणिक, अनुषंगिक माहिती गोळा केली जाते. देशातील प्रत्येक कुटुंबाच्या भौतिक साधन-सुविधा व मालमत्तेविषयीही माहिती घेऊन विकासात्मक योजना आखल्या जातात.

- 6 NOV 2023 तरुण भारत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बुद्धीबळ स्पर्धेत विद्यापीठ संघास विजेतेपद

## आदित्य सावळकरची पश्चिम विभागीय स्पर्धेसाठी निवड

प्रतिनिधी
कोल्हापूर

डॉ. जे. जे. मगदूम कॉलेज ऑफ इंजीनियरिंग येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेमध्ये विद्यापीठाच्या संघाने सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. त्याचबरोबर विद्यापीठाच्या बीए–स्पोर्ट्‌सचा विद्यार्थी आदित्य सावळकर याने स्पर्धेत वैयक्तिक प्रथम क्रमांक पटकावत आंतरविभागीय स्पर्धेमध्ये प्रवेश मिळवला. विजेत्या संघाचा सत्कार कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांच्या हस्ते झाला. विजयी संघामध्ये आदित्य सावळकर यांच्यासह सत्यजीत माने, राहुल लोखंडे आणि श्रीधर निंबाळकर यांचा समावेश आहे. क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे यांचे मार्गदर्शन लाभले.



**कोल्हापूर : विद्यापीठस्तरीय बुद्धीबळ स्पर्धेत सर्वसाधारण विजेत्या संघाचे अभिनंदन करताना कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव व डॉ. प्रल्हाद जाखले**

## बिद्री महाविद्यालयात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर कार्यशाळा

**सरवडे :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे विद्यार्थ्यांच्या भविष्याच्या दृष्टीने महत्वाचे असून आपण त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी असे आवाहन प्राचार्य डॉ. एस.बी.भांबर यांनी केले. बिद्री येथील दूधसाखर महाविद्यालयातील इंग्रजी विभाग आणि गुणवत्ता हमीकक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय शैक्षणीक धोरण यावर कार्यशाळा आयोजिली होती. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. संजय पाटील होते. प्राची शिंदे हिने रमनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक डॉ. डी. एन. पाटील यांनी पाहुण्याची ओळख डॉ. सी. वाय. जाधव. यांनी करुन दिली. आभार डॉ. एस. ए. साळोखे यांनी मानले.

लोकमत

# विद्यापीठात जनगणना माहिती संशोधन केंद्र

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात स्थापन केलेल्या जनगणना माहिती कार्य केंद्रामध्ये दर्जेदार संशोधन व्हावे, अशी अपेक्षा जनगणना कार्य संचालनालयाच्या (महाराष्ट्र) संचालक डॉ. निरुपमा डांगे यांनी शुक्रवारी व्यक्त केली.

या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठासमवेत सामंजस्य करार आणि कार्यकेंद्राचे औपचारिक उद्घाटन अशा कार्यक्रमात डॉ. डांगे बोलत होत्या. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते. ए.एन. राजीव यांनी विशेष सादरीकरण केले.

सामंजस्य करारावर संचालनालयाच्या वतीने संचालक डॉ. डांगे यांनी तर विद्यापीठाच्या वतीने कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे यांनी स्वाक्षरी केल्या. अधिविभाग प्रमुख डॉ. शशीभूषण महाडिक यांनी स्वागत केले.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागातील विद्यार्थ्यांचे यश

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागामध्ये बी.टेक. फूड टेक्नॉलॉजीच्या द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांनी अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी (एडीसीईटी), आष्टा यांनी घेतलेल्या कुकिंग विदाऊट फायर व आयडियाथॉन स्पर्धेत यश संपादन केले. विराज पवार, प्रेमराज साळुंखे व सागर मोरे यांनी आयडियाथॉन स्पर्धेत दुसरा क्रमांक मिळविला. विद्यार्थ्यांनी 'द फ्यूचर ऑफ फार्मिंग : हायड्रोपोनिक्स अँड एरोपोनिक्स' विषयावर सादरीकरण केले. नितीन विलास सोन्ने व नंदिनी उत्तम साळवी यांनी कुकिंग विदाऊट फायर स्पर्धेत तिसरा क्रमांक प्राप्त केला. तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. एस. एन. सपली, फूड टेक्नॉलॉजीचे समन्वयक डॉ. इराण्णा उडचान, साहाय्यक प्रा. वैभव बागे, डॉ. सिद्धार्थ लोखंडे यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.

सकाळ

# तंत्रज्ञान अधिविभागातील विद्यार्थ्यांचे यश

**कोल्हापूर :** आष्टा (जि. सांगली) येथील अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीच्यवतीने 'कुकिंग विदाउट फायर' आणि 'आयडीयाथॉन' स्पर्धा घेण्यात आली. त्यात शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागामधील बी.टेक. फूड टेक्नॉलॉजीच्या द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांनी यश मिळविले. यामध्ये विराज किरण पवार, प्रेमराज कैलास साळुंखे, सागर सुधीर मोरे या विद्यार्थ्यांना 'आयडीयाथॉन' स्पर्धेत दुसरा क्रमांक मिळविला. त्यांनी 'द फ्यूचर ऑफ फार्मिंग : हाइड्रोपोनिक्स अँड एरोपोनिक्स' याविषयावर सादरीकरण केले. नितिन विलास सोन्ने आणि नंदिनी उत्तम साळवी यांना 'कुकिंग विदाउट फायर' या स्पर्धेत तिसरा क्रमांक मिळाला. त्यांनी गाजर, बदाम, काजू, खोबरे आणि कंडेन्स्ड मिल्क आदी पदार्थांचा वापर करून पौष्टिक लाडू बनवले. या विद्यार्थ्यांना तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. एस. एन. सपली, फूड टेक्नॉलॉजीचे समन्वयक डॉ. इरांणा उडचान, प्रा.वैभव बागे, डॉ. सिद्धार्थ लोखंडे यांचे मार्गदर्शन लाभले.

पुढारी

# पी. बी. साळुंखे कन्या विद्या मंदिरात विद्यार्थी व्यक्तिमत्त्व विकासाचे उपक्रम

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट अधिविभागाच्या समाजकार्य अभ्यासक्रमांतर्गत पी. बी. साळुंखे कन्या विद्या मंदिर क्र. ४७ मनपा शाळेमध्ये विद्यार्थी व्यक्तिमत्त्व विकासाचे विविध उपक्रम राबविण्यात आले. समाजकार्य अभ्यासक्रमाच्या विद्यार्थिनी स्वाती राऊत, शाहीन पाटील, प्रीती कांबळे यांनी पी. बी. साळुंखे कन्या विद्या मंदिर येथे क्षेत्रकार्य करत असताना शाळेतील विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी चित्रकला, हस्ताक्षर, स्मरणशक्ती स्पर्धा, दहीहंडी उत्सव, रक्षाबंधन, वृक्षारोपण, संगणक शिक्षण; याबरोबरच समुदाय भेट, अंगणवाडी भेट, नगरसेवक भेट, आशासेविका भेटीचे आयोजन केले. कार्यक्रमासाठी क्षेत्रकार्य मार्गदर्शिका डॉ. उर्मिला दशवंत पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. मुख्याध्यापिका गीता काळे अध्यक्षस्थानी होत्या. माजी नगरसेवक उत्तम कोराणे यांच्याहस्ते बक्षीस वितरण समारंभ झाला.

तरूण भारत

# विवेकानंदच्या बारा विद्यार्थ्यांची विद्यापीठ अविष्कारसाठी निवड

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये सर्व शाखातील विद्यार्थ्यांसाठी अविष्कार संशोधन स्पर्धा उत्साहात पार पडली. स्पर्धेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते झाले. स्पर्धेसाठी सर्व शाखांमधून ६५ संशोधन प्रकल्पावर आधारित पोस्टर्स, मॉडिलचे सादरीकरण विद्यार्थ्यांनी केले. विज्ञान, कला, इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी, शेती व पशुपालन, वाणिज्य, औषधनिर्माण शास्त्र या स्पर्धांमधून प्रत्येकी तीन विजेते जाहीर केले. १२ विजेत्यांना शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित जिल्हा स्तरीय अविष्कार स्पर्धेसाठी निवड केली. स्पर्धेचे नियोजन अविष्कार समन्व्यक डॉ. सुमैया इनामदार, डॉ. शुभांगी काळे, प्रा. सोमनाथ काळे, प्रा. एस. जी. कुलकर्णी, प्रा. आर. आर. माने, डॉ. सुनिल भोसले यांनी केले.

तरुण भारत

# वल्लभभाई पटेल यांची जयंती साजरी

कोल्हापूर : भारताचे लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती आणि माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या स्मृतिदिना निमित्ताने या महान नेत्यांच्या स्मृतींना शिवाजी विद्यापीठात अभिवादन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत एकता दौड आयोजित करण्यात आली. शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात सरदार वल्लभभाई पटेल आणि इंदिरा गांधी यांच्या प्रतिमांचे पूजन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. तत्पूर्वी राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे विद्यापीठ प्रांगणात मुख्य प्रशासकीय भवनापासून एकता दौड आयोजित करण्यात आली.

महासत्ता

# डॉ.मगदूम अभियांत्रिकी कॉलेजची अग्रणी महाविद्यालय म्हणून निवड

जयसिंगपूर, ता.४(प्रतिनिधी)-

येथील डॉ.जे.जे.मगदूम कॉलेज ऑफ इंजीनिअरिंग महाविद्यालयाची शिवाजी विद्यापीठाकडून प्रमुख अग्रणी महाविद्यालय म्हणून निवड झाली आहे अशी माहिती प्राचार्या डॉ.शुभांगी पाटील व डॉ. उमेश देशन्नावरं यांनी दिली.

सदर योजनेद्वारे विद्यार्थी, शिक्षक, प्रशासकीय सेवक यांच्याकरता वेगवेगळे निरंतर शिक्षणाचे कार्यक्रम घेणे, क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणे व समाजाभिमुख उपक्रम राबविणे हे ध्येय या योजनेचे असते. आमचे महाविद्यालय सर्व महाविद्यालयांना सोबत घेऊन ही भूमिका निभावेल असा विश्वास प्राचार्या व ॲडव्हायझर यांनी व्यक्त केला. शैक्षणिक वर्ष सन २०२३-२४ ते २०२५-२६ या तीन वर्षाच्या कालावधीकरता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी महाविद्यालयाची प्रमुख अग्रणी महाविद्यालय म्हणून निवड केली आहे. विद्यापीठाशी संलग्नित असणाऱ्या अनुदानित व विना-अनुदानित महाविद्यालयांमधून अग्रणी महाविद्यालय म्हणून विनाअनुदानित इंजिनिअरिंग कॉलेजची निवड होणे ही कॉलेजच्या दृष्टिकोनातून प्रशंसनिय बाब आहे असे मत कॅम्पस डायरेक्टर डॉ. सुनील आडमुठे यांनी व्यक्त केले.

महाविद्यालयास दिलेल्या या सन्मानाबद्दल डॉ. जे. जे. मगदूम ट्रस्टचे चेअरमन डॉ. विजय मगदूम व व्हाईस चेअरपर्सन डॉ. सोनाली मगदूम यांनी दिलेल्या संधीची व सन्मानाची जबाबदारी आमचे महाविद्यालय व्यवस्थित पार पडेल असा विश्वास व्यक्त केला.

पुढारी

# श्रेया बराले, सृष्टी कुलकर्णी यांची विद्यापीठ संघात निवड

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

सृष्टी कुलकर्णीची राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धा, तर श्रेया बरालेची आंतरविभागीय तायक्वाँदो स्पर्धेतून राज्यस्तरीय विद्यापीठ संघात निवड झाली.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी त्यांचे अभिनंदन केले. खेळाडूंना जिमखानाप्रमुख प्रा. हवलदार, एन. आर. सणगर, प्रा. सहिदा कच्छी, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रशिक्षक विश्वास बराले यांचे मार्गदर्शन लाभले.